ठाणे महानगरपालिका, ठाणे
संचालित
**चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था**
महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय इमारत, तळ मजला, वेदांत शॉपींग कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) ४०० ६०६. दुरध्वनी ०२२-२५८८१४२१

# प्रवेश परीक्षा- २०२३

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. तसेच, अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा पूर्व परीक्षा - २०२४ करीता विद्यार्थी/ प्रशिक्षणार्थी यांना पूर्णवेळ पूर्व प्रशिक्षण मिळणेकरीता ठाणे महानगरपालिका, ठाणे संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या पूर्व परीक्षा मार्गदर्शन वर्गात (Prelims Batch) प्रवेश देणेकरीता संस्थेमार्फत रविवार, दिनांक ३० जुलै २०२३ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत एक प्रवेश परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाणार आहे. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या संस्थेत सन २०२३ च्या पूर्व परीक्षा मार्गदर्शन वर्गात (Prelims Batch) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी/प्रशिक्षणार्थींनी दिनांक ३०/०६/२०२३ ते २६/०७/२०२३ या कालावधीत संस्थेच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या https://forms.epravesh.com/CDInstitute/ या लिंक मधील विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. टपालद्वारे, कुरिअरद्वारे, तसेच ई-मेल द्वारे प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी.

संस्थेत प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांची/ प्रशिक्षणार्थींची निवड ही प्रवेश परीक्षा व मुलाखतीव्दारे गुणवत्तेच्या आधारे प्रचलित पध्दतीने करण्यात येते. संस्थेमार्फत घेण्यांत येणाऱ्या प्रवेश परीक्षेच्या अटी व शर्ती, पात्रता, प्रवेश प्रक्रिया इत्यादी बाबींबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. **प्रवेश क्षमता -** ७० प्रशिक्षणार्थी

२. **प्रवेश परीक्षा पध्दती : ऑनलाईन पध्दतीने :-**

लेखी परीक्षा २०० गुण (ऑनलाईन पध्दतीने) व मुलाखत ५० गुण (ऑफलाईन पध्दतीने) अश्याप्रकारे संस्थेची प्रवेश परीक्षा एकूण २५० गुणांची राहील. लेखी प्रवेश परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या धर्तीवर घेण्यात येईल. तसेच नागरी सेवा पूर्व परीक्षा - २०२३ च्या अभ्यासक्रमावर आधारित असेल.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| भाग- १<br>सामान्य अध्ययन - I<br>SECTION - I<br>General Studies - I | ५० | १०० | ENGLISH | एकूण वेळ : २ तास<br>सकाळी ११.०० ते<br>दुपारी ०१.००<br>वाजेपर्यंत |
| भाग- २<br>सामान्य अध्ययन - II<br>SECTION - II<br>(CSAT) | ४० | १०० | ENGLISH | |
| मुलाखत | | ५० | MARATHI,<br>HINDI &<br>ENGLISH | |

Scanned with OKEN Scanner

- भाग- 1 ( SECTION - I ) या विषयाचा पेपर सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० पर्यंत घेण्यात येईल व भाग - 2 (SECTION - II ) या विषयाचा पेपर दुपारी १२.०० ते दुपारी १.०० पर्यंत घेण्यात येईल. सदरचे दोन्ही विषयांचे पेपर सलग होतील व दोन्ही पेपर दरम्यान विश्रांतीसाठी वेळ दिला जाणार नाही.

- सामान्य अध्ययन भाग - २ SECTION - II (CSAT) हा Qualifying Section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण मिळणे अनिवार्य आहे.

- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षाप्रमाणे गुणवत्ता यादी सामान्य अध्ययन- १ (SECTION – I) या भागावरील गुणांवर व मुलाखतीमध्ये प्राप्त गुणांवर आधारीत राहील.

**३. प्रवेश परीक्षेचा दिनांक : रविवार, दि. ३०/०७/२०२३**

**४. परीक्षेचा कालावधी** : सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० ( एकूण - १२० मिनिटे/ दोन तास )

**५. परीक्षेचे स्वरुप** : प्रवेश परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची राहील व प्रत्येक चुकीच्या उत्तराला १/३ किंवा ०.३३% एवढे गुण कमी करण्यात येतील. (Objective Type Multiple Choice Question (MCQ). Negative Marking one-third (०.३३ %) of Marks assigned to that question.)

**६. प्रवेश परीक्षा अर्हता / पात्रता :-**

अ) शैक्षणिक अर्हता -:
1) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर
2) किंवा पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाची परीक्षा दिलेले विद्यार्थी व ज्यांचे निकाल प्रलंबित आहेत, असे विद्यार्थी अर्ज करु शकतात.

ब) वयोमर्यादा-: उमेदवाराचे वय दि. ०१ ऑगस्ट २०२३ रोजी खालीलप्रमाणे असावे.

| | | |
|---|---|---|
| खुला संवर्ग | - | २१ ते ३१ वर्ष, |
| इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज./EWS | - | २१ ते ३४ वर्ष, |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती | - | २१ ते ३६ वर्ष |

(सदर उपरोक्त नमुद वयोमर्यादा नुसार दिनांक ०१ ऑगस्ट २०२३ रोजी उमेदवाराचे वय कमी किंवा जास्त नसावे.)

क) उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी/रहिवासी असला पाहिजे (Domiciled in Maharashtra)

ड) संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभाग घेता येणार नाही.

इ) वैद्यकीय पदवीधारकांनी Internship पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

**७. प्रवेश परीक्षा शुल्क :- रु. १००/-**

**ई.सी.एस/एन.ई.एफ.टी द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठी तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | महानगरपालिकेचे नांव | ठाणे महानगरपालिका, ठाणे |
| २ | बँक खात्याचे नांव | TMC HEAD OFFICE (MAHASUL) |
| ३ | बँक शाखेचे नाव व पत्ता | BANK OF MAHARASHTRA |
| ४ | बँक खाते क्रमांक | 60360530858 |
| ५ | बँक शाखेचा क्रमांक | 1216 |
| ६ | बँक शाखेचे नाव | PANCHPAKHADI, THANE (W) |
| ७ | एम.आय.सी.आर. क्रमांक | 400014103 |
| ८ | आय.एफ.एस. सांकेतांक | MAHB0001216 |

**८. अर्ज करण्याची पध्दत:-**

१) ऑनलाईन अर्जाची लिंक संस्थेच्या आणि ठाणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज हे संस्थेकडील विहित नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, टपालद्वारे, कुरिअरद्वारे, तसेच ई-मेल द्वारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी.

**९. प्रवेश परीक्षा संबंधीत महत्वाची माहिती- वेळापत्रक**

अ) ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करण्याचा कालावधी : दिनांक - ३०/०६/२०२३ ते २६/०७/२०२३
(Link - https://forms.epravesh.com/CDInstitute/ )

ब) प्रवेश परीक्षा दिनांक (ऑनलाईन पध्दतीने) : दिनांक - ३०/०७/२०२३

क) मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द : दिनांक - ०४/०८/२०२३

ड) मुलाखतीचा दिनांक (ऑफलाईन पध्दतीने) : दिनांक - ०८/०८/२०२३ ते १०/०८/२०२३

इ) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द : दिनांक - १२/०८/२०२३

१०. अंतिम निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींना केवळ एका वर्षाकरीता संस्थेत प्रवेश देण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

११. विद्यावेतन (Stipend) :- अंतिम निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींच्या प्रत्येक महिन्यातील कमीत कमी ८०% बायोमेट्रिक उपस्थितीनुसार प्रशिक्षणार्थींना मासिक विद्यावेतन रु. ३०००/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) इतकी रक्कम पाठ्यवेतन / विद्यावेतन म्हणून देण्यात येईल.

१२. कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारण्याचे अधिकार संस्थेस राहतील.

१३. परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती व सूचना संस्थेच्या नोटीस बोर्डावर तसेच संस्थेच्या www.cdinstitute.in आणि www.cdinstitute.net या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहेत.

१४. अधिक माहितीसाठी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र भुषण ति. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय इमारत, तळ मजला, वेदांत कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ या कार्यालयीन वेळेत समक्ष येऊन संपर्क साधावा.

30/06/2023

( महादेव जगताप )
संचालक,
चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Scanned with OKEN Scanner